# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/12/2022 (बुधवार) दुपार

---

### दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा वार्ड क्र. ९ कळमेश्वर येथे दिनांक २०/१२/२०२२ चे ०५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— मोहन टिकाराम अढाउ, वय ६५ वर्ष, रा. वार्ड क्र. ९ कळमेश्वर ता. कळमेश्वर हा झोपेत असतांना नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे— नितीन मोहन अढाउ, रा. वार्ड क्र ९ कळमेश्वर ता. कळमेश्वर याने दारूच्या नशेत विनाकारण फिर्यादीच्या डोक्याच्या मागे पोळी बनविण्याचे लाकडी कोरपाटने मारले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १६११ पोलीस स्टेशन कळमेश्वर मो नं. ८२०८५११६६३ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर खंडाळा शिवारात एन. एच. ४४ रोड वरील कन्हान नदीचा पुला जवळ दिनांक १९/१२/२०२२ चे १५.१४ वा. दते १९.२० वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपी वाहनाने नमुद ठिकाणी एका अनोळखी इसमाचा अपघात झाला असुन तो मृत अवस्थेत पडुन आहे अशा मिळालेल्या माहितीवरुन पोस्टे कन्हान येथील पोलीस पथकांनी नमुद घटनास्थळी जावुन पाहणी केली असता तेथे एक इसम मृत अवस्थेत रोडवर पडलेला असुन सदर मृतकाच्या प्रेताची पाहणी केली असता त्याच्या डोक्यातुन पायातुन रक्त निघत असुन त्याच्या डोक्यावरून व पायावरुन वाहन गेल्याचे दिसुन आले सदर मृतकाची तपासणी केली असता त्याच्या जवळुन कोणतेही ओळखपत्र व कागदपत्र प्राप्त न झाल्याने सदर इसमाबाबत घटनास्थळाच्या परीसरातील लोकांना विचारपुस केली असता त्यांच्या कडुन माहित पडले की, सदर इसम हा नेरी शिवारातील विट भट्टीवर काम करणारा असुन मृतकाचे नाव पप्पू मातादीन सरोज, वय अंदाजे ४५ वर्ष, रा. प्रतापगड उ. प्र. असे आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस हवालदार जैलाल सहारे, ब. नं. १६८ रा. पोस्टे कन्हान. यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ 'अ भादवी सह कलम १८४, १३४(ए), १३४(बी) मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महादेव सुरजुसे पोस्टे कन्हान मो. नं. ७६६६६४०२१८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**